admn18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/८१९/ ५११

दि. २८ फेब्रुवारी,२०१९

## परिपत्रक

विषयः- व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ प्रवेशाविषयी उद्भवलेल्या विसंगतीबाबत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमाची सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात आली. उमेदवाराने प्रवेश अर्ज दाखल करतांना त्यासोबत संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची गुणवत्ता व आरक्षण निश्चित करण्यात आले आणि त्याआधारे प्रवेशाचे वाटप करण्यात आले. प्रवेशाचे वाटप ज्या धर्तीवर झालेले आहे, अशी संबंधित मूळ कागदपत्रे तपासून प्रवेश निश्चित करण्याची कार्यपध्दती संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात आली.

तथापि, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या प्रतिनिधींनी प्रत्येक महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी केली असता, ४२ महाविद्यालयातील १२९ विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशाशी संबंधित मूळ कागदपत्रांमध्ये विसंगती आढळून आलेल्या आहेत. याबाबत महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्याचे नाव व त्याच्या प्रवेशाशी संबंधित विसंगतीचा तपशील सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेला आहे. सदर परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाशी संबंधित विसंगतीचे कागदपत्र कृषी परिषदस्तरावर तपासून विसंगतीचे निराकरण करण्याच्या सूचना मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिलेल्या आहेत.

यास अनुसरून सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी विसंगती असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे संबंधित मूळ कागदपत्रे घेऊन दि. १२ मार्च,२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता संचालक (शिक्षण), कृषी परिषद, पुणे यांच्या कार्यालयात महाविद्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यास पाठवावे. याविषयी काही शंका असल्यास या कार्यालयातील डॉ. नितीन पतके (भ्रमणध्वनी क्र. ७५८८८८३५०६) यांचेशी संपर्क साधावा. याबाबत

Scanned by CamScanner

महाविद्यालयाकडून प्रतिसाद न मिळाल्यास त्या महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास, प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त होणार नाही आणि याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(महेन्द्र ब. वारभुवन भा प्र से )**
**महासंचालक**

प्रति,

**सोबतच्या परिशिष्टातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.**

प्रतः-

१. **मा. आयुक्त,** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी...

२. **मे. जे. डीन. सॉफ्ट,** आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली,पुणे यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावरील Education Tab मध्ये उपलब्ध करून देण्यात यावे.

Scanned by CamScanner